19 MAR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नीना मेस्त्री-नाईक यांची निवेदनशैली अजरामर राहील : रवींद्र ओबेरॉय

## विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागात आदरांजली

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : 'आकाशवाणीच्या ज्येष्ठ निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांच्या आवाजात जादू होती. शब्दांत भावना ओतण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांची निवेदनशैली अजरामर राहील,' असा विश्वास ज्येष्ठ उद्योजक रवींद्र ओबेरॉय यांनी व्यक्त केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नीना मेस्त्री-नाईक यांना आदरांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत भावना व्यक्त करताना रवींद्र ओबेरॉय. डावीकडून सुनील गायकवाड, प्रताप पाटील.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात आयोजित शोकसभेत नाईक यांना आदरांजली वाहण्यात आली. अध्यक्षस्थानी कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे संचालक डॉ. सुनील गायकवाड होते. 'नाईक यांनी तीस वर्षे आकाशवाणीत काम केले. त्यांनी अनेक लेखक, अभ्यासकांच्या मुलाखती घेतल्या. नवख्या लेखकांना आकाशवाणीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांची उणीव सर्वांनाच भासेल', अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, लेखक डॉ. वसंत गायकवाड, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, अरुण नाईक, तन्वी नाईक, डॉ. मेघा पानसरे, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, आरजे मनीष आपटे, आरजे ओंकार, घोडावत विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख जयप्रकाश पाटील, ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीहरी देशपांडे, तेजस्विनी देसाई, डॉ. शिवाजी जाधव, सुमेधा साळुंखे, प्रसाद ठाकूर यांनी भावना व्यक्त केल्या. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, महेश कराडकर यांनी पाठवलेल्या शोक संदेशाचे वाचन आरजे प्राजक्ता शहा हिने केले.

19 MAR 2024
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नीना मेस्त्री-नाईक यांची निवेदनशैली अजरामर

**रवींद्र ओबेरॉय : पत्रकारिता व जनसंवाद विभागात आदरांजली**

**कोल्हापूर :** आकाशवाणीच्या ज्येष्ठ निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांच्या आवाजात जादू होती. शब्दांत भावना ओतण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांची निवेदनशैली अजरामर राहील, असा विश्वास ज्येष्ठ उद्योजक रवींद्र ओबेरॉय यांनी व्यक्त केला.



**कोल्हापूर : नीना मेस्त्री-नाईक यांना आदरांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत भावना व्यक्त करताना रवींद्र ओबेरॉय. यावेळी डॉ. सुनील गायकवाड, डॉ. प्रताप पाटील.**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात नीना मेस्त्री-नाईक यांना अभिवादन करण्यासाठी शोकसभेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे संचालक डॉ. सुनील गायकवाड होते.

यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, मराठी विभागातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, निवृत्त शिक्षणाधिकारी आणि लेखक डॉ. वसंत गायकवाड, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, नीना मेस्त्री यांचे पती अरुण नाईक, कन्या तन्वी नाईक, विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, आरजे मनीष आपटे, सांगली येथील आरजे ओंकार, संजय घोडावत विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख जयप्रकाश पाटील, ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीहरी देशपांडे, तेजस्विनी देसाई, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदींनी नीना मेस्त्री-नाईक यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या.

नीना मेस्त्री-नाईक यांनी तीस वर्षे आकाशवाणीत काम केले. या काळात त्यांनी अनेक लेखक, अभ्यासकांच्या मुलाखती घेतल्या. अनेक कादंबऱ्यांचे अभिवाचन केले. नवख्या लेखकांना आकाशवाणीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी सतत मार्गदर्शन केले. त्यांची उणीव सर्वांनाच भासेल, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

19 MAR 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराज स्त्रियांचा सन्मान करीत

## इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मध्ययुगीन जगाच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते. ज्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारा कोणीही असो, त्याला अतिशय कडक शिक्षा केल्या. सद्यस्थितीत स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होते याचीच चिंता वाटते. केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा देवून भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कै. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. मंजुश्री पवार. सोबत डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील.

डॉ. भारती पाटील म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन नेहमीच समतावादी होता. त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांनी स्थापित केलेल्या प्रशासनिक राज्यव्यवस्थेमध्ये आढळून येते. औरंगजेबाच्या दरबारातील लेखक खाफीखान यानेही शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख, डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

19 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गुरू-शिष्य' प्रदर्शनाला रसिकांचा प्रतिसाद

कोल्हापूर, ता. १८ : रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'गुरू- शिष्य' उपक्रमांतर्गत कला प्रदर्शनाला रसिकांचा प्रतिसाद मिळतो आहे. गुरुवार (ता.२१) पर्यंत सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहील.

प्रदर्शनात ज्येष्ठांपासून नवोदितांपर्यंत विविध वयोगटांतील कलाकारांनी रेखाटलेल्या कलाकृती मांडल्या आहेत. वास्तववादीपासून अमूर्तवादी कलाशैलीपर्यंतच्या कलाकृती या कलाकारांनी साकारल्या आहेत. निसर्ग चित्रे, रचना चित्रे, छायाचित्रांचाही प्रदर्शनात समावेश आहे. चार दिवसात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अलोक जत्राटकर, डॉ. विनोद कांबळे, प्राचार्य अस्मिता जगताप, चित्रकार संजय शेलार, सी. विष्णू, पार्श्वनाथ नांद्रे, सागर बगाडे, अशोक भोईटे, महेश पांचाळ, शिल्पकार सतीश घारगे, दीपक कांबळे, रोहन कुंभार आदींनी प्रदर्शनाला भेट दिली.



कोल्हापूर : गुरु-शिष्य चित्र प्रदर्शन पाहताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी सहभागी चित्रकार.

जनसंपर्क कक्ष
19 MAR 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रप्रदर्शनाला उत्स्फुर्त प्रतिसाद

■ अनेक मान्यवरांनी दिली प्रदर्शनाला भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

रेखा सम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'गुरु शिष्य' उपक्रमांतर्गत कलाप्रदर्शनास रसिकांची दाद मिळत आहे. या प्रदर्शनाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, दमसाचे डॉ. विनोद कांबळे, प्राचार्य अस्मिता जगताप यांनी चित्रप्रदर्शनाला भेट दिली. कलाकारांनी साकारलेली चित्रे पाहून कौतुक केले..

वास्तववादीपासून अमूर्तवादी कलाशैलीपर्यंतच्या कलाकृती या कलाकारांनी साकारल्या आहेत.



कोल्हापूर : चित्रप्रदर्शन पाहताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आदी.

निसर्ग चित्रे, रचना चित्रे, छायाचित्रे रसिकांना मोहित करत आहेत.

यामध्ये विजय टिपुगडे, विलास बकरे, शिवाजी मस्के, मनोज दरेकर,संतोष पोवार, नागेश हंकारे, बबन माने, अभिजीत कांबळे, प्रविण वाघमारे, गजेंद्र वाघमारे, शैलेश राऊत, किशोर राठोड, राहूल रेपे, विजय उपाध्ये, अरिफ तांबोळी, प्रकाश मोहिते, नवज्योत काळे, सर्वेश देवरूखकर, पुष्कराज मेस्त्री, शुभम कुंभार, ओंकार कोळेकर, इंद्रजित बंदसोडे, पुनम राऊत, सुदर्शन वंडकर यांच्या कलाकृतींचा समावेश आहे.

हे प्रदर्शन २१ मार्चपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ यावेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2024
सकाळ

# जीवरसायनशास्त्राच्या तिघांची फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रतिभा माळी, हर्षद बोटे आणि चेतन टाके या तीन विद्यार्थ्यांची फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड झाली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेतून वर्ग दोन (राजपत्रित) अधिकारी सहायक रासायनिक विश्लेषक पदावर फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड झाली आहे. या संशोधन विद्यार्थ्यांना कुलगरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिविभागप्रमुख प्रा.कैलास सोनवणे, प्रा.ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, पंकज पवार, पद्मा दांडगे, संदीप काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2024
तरुण भारत

# जीवरसायनशास्त्रच्या तीन विद्यार्थ्यांची राजपत्रित अधिकारीपदी निवड

कोल्हापूर : 'शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रतिभा माळी, हर्षद बोटे व चेतन टाके या तीन विद्यार्थ्यांची लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षेतून वर्ग-२ (राजपत्रित) अधिकारी असिस्टंट केमिकल अनालायझर पदावर फॉरेन्सिक डिपार्टमेंट मध्ये निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, डॉ. पंकज पवार, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. संदीप काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठातील तीन विद्यार्थ्यांची 'फॉरेन्सिक'मध्ये निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रतिभा माळी, हर्षद बोटे आणि चेतन टाके या तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षेतून वर्ग-२ (राजपत्रित) अधिकारी पदावर फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड झाली. या संशोधन विद्यार्थ्यांना कुलगरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अधिविभागप्रमुख प्रा. कैलास सोनवणे, प्रा. ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, डॉ. पंकज पवार, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. संदीप काळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातील तीन विद्यार्थ्यांची फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रतिभा माळी, हर्षद बोटे, चेतन टाके या तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षेतून वर्ग-२ (राजपत्रित) अधिकारी पदावर फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिविभागप्रमुख प्रा. कैलास सोनवणे, प्रा. ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, डॉ. पंकज पवार, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. संदीप काळे यांचे संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

19 MAR 2024 क्रांतिसिंह
अध्यापक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ.अ‍ॅड.पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात स्वतंत्र अभ्यासिका



कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (अ‍ॅड.) राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेल्या ३५ लाख रुपयांच्या पुंजीतून त्यांची एकमेव दिवंगत कन्या डॉ. (अ‍ॅड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात साकारत असणारी विद्यार्थिनींसाठीची अभ्यासिका ही त्यांची विद्यापीठास अमूल्य भेट आहे, असे भावोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे काढले. येत्या सहा महिन्यांत या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

डॉ. पणदूरकर यांनी दिलेल्या देणगीमधून शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी डॉ. (अ‍ॅड.) रूपाली पणदूरकर यांच्या नावे स्वतंत्र अभ्यासिका बांधण्याच्या कामाचे भूमीपूजन अत्यंत हृद्य वातावरणात करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह पणदूरकर दांपत्य आणि त्यांचे नातेवाईक, मित्र परिवार उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका नव्हती. तसेच वसतिगृहामध्ये त्यांना विहीत वेळेत परत येणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन कमवा व शिका वसतिगृहाच्या सुरक्षित परिसरात साकारत असलेल्या अभ्यासिकेमुळे विद्यार्थिनींची मोठी सोय होणार आहे. त्यासाठी पणदूरकर कुटुंबियांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी डॉ. पणदूरकर यांनी कै. रूपाली पणदूरकर यांचा स्मृतिदिन १५ सप्टेंबर असून त्या दिवशी या अभ्यासिकेचे उद्घाटन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सुरवातीला पणदूरकर दांपत्याच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, भूगोल अधिविभागाचे डॉ. संभाजी शिंदे, वसतिगृह अधीक्षक डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. गिरीश कुलकर्णी, रमेश पोवार, उपकुलसचिव रणजीत यादव, विजय पोवार, विद्युत उपअभियंता अमित कांबळे, शिवकुमार ध्याडे, जी.बी. मस्ती, वैभव आरडेकर यांच्यासह अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. (अ‍ॅड.) रूपाली पणदूरकर यांच्याविषयी...

अ‍ॅड. रूपाली पणदूरकर यांनी सर्व शिक्षण शिवाजी विद्यापीठातून पूर्ण केले. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी त्यांनी महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक व कायदेविषयक अभ्यास या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच. डी. मिळविली होती. सतार वादनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण गांधर्व महाविद्यालयातून घेऊन सार्वजनिक व्यासपीठांवरुन सतारवादनाचे कार्यक्रम केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायदीप या संशोधन पत्रिकेत त्यांचे अभ्यासपूर्ण संशोधन लेखांमुळे प्रसिद्ध झाले होते. त्यांनी २००१ पासून [illegible] १४ वर्षे कोल्हापूर [illegible] न्यायालयात वकिली केली. डॉ. रूपाली यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मातापित्यांनी शिवाजी विद्यापीठाला ३५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यातून विद्यार्थिनींसाठीची अभ्यासिका साकार होत आहे.

### अभ्यासिकेच्या इमारती विषयी...

डॉ. (अ‍ॅड.) कै. रूपाली पणदूरकर अभ्यासिका इमारतीच्या आराखड्यामध्ये तळमजला अधिक दुमजली इमारत प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात १८३२ चौरस फूट क्षेत्रफळाचा तळमजला बांधण्यात येणार आहे. अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनीला सदर कामाचा ठेका देण्यात आला असून सहा महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. येथे एकाच वेळी शंभर विद्यार्थिनींची अभ्यासाला बसण्याची सोय होणार आहे. पुढील दुमजली बांधकामानंतर एकूण ३०० विद्यार्थिनींची सोय होईल.

19 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनोटेक्नॉलॉजीमुळे फार्मा क्षेत्रात संधी

## व्ही. व्ही. कार्जिनी : कोरे फार्मसीत आंतरराष्ट्रीय परिषद

■ सकाळ वृत्तसेवा




वारणानगर : आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. विलास कार्जिंत्री यांनी मार्गदर्शन केले. या वेळी डॉ. तुषार कुमेरिया, डॉ. श्रीनिवास मोहिते, डॉ. जॉन डिसोझा, डॉ. सचिन पाटील, डॉ. सुराश किल्लेदार, डॉ. निलेश चौगुले, डॉ. धनराज जडगे आदी उपस्थित होते.

वारणानगर, ता. १८ : आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजीमुळे फार्मा क्षेत्रात प्रचंड संधी असल्याची माहिती वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. व्ही. कार्जिनी यांनी येथे व्यक्त केले.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात आंतरराष्ट्रीय पातळीवर औषधनिर्माणशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे संशोधन क्षेत्रात होणारे आमुलाग्र परिणाम नवख्या संशोधकांसमोर मांडण्याच्या उद्देशाने कोरे फार्मसीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या वेळी ते बोलत होते.

इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन कोल्हापूर विभाग आणि तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर, राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर, अशोकराव माने ग्रुप वाठार आणि सावे, आनंदी कॉलेज ऑफ फार्मसी, कळंबे तर्फ कळे, शिवाजी विद्यापीठ फार्मसी महाविद्यालय प्राचार्य संघटना यांच्यातर्फे याचे आयोजन केले होते. परिषदेत युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ वेल्स सिडनी ऑस्ट्रेलियाचे डॉ. तुषार कुमेरीया, युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन स्कूल ऑफ फार्मसीच्या डॉ. स्मिता साळुंके, युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन लँड ऑस्ट्रेलियाचे डॉ. युसुफ मोहम्मद इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे डॉ. सिद्धार्थ झुनझुनवाला यांनी 'नवऔषधप्रणाली तंत्रज्ञान' या विषयावरील संकल्पनांचा उलगडा केला.

परिषदेसाठी देशभरातून सुमारे ७०० हून अधिक संशोधक, विद्यार्थी तथा अध्यापकांनी सहभाग नोंदवला. पोस्टर प्रेझेंटेशन कॉम्पिटिशनमध्ये देशभरातून शंभरहून अधिक संशोधकांनी आपल्या संशोधनावर आधारित संकल्पनांचे सादरीकरण केले. परिषद यशस्वी करण्यासाठी वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, डॉ. आर. डी. सावंत, सतीश देसाई, विजयसिंह माने, व्ही. व्ही. कार्जिनी, डॉ. एच. एम. कदम यांच्या सहकार्याने प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, डॉ. श्रीनिवास मोहिते, डॉ. सचिन पाटील, डॉ. एच. एन. मोरे, डॉ. निलेश चौगुले, डॉ. धनराज जडगे, डॉ. अभिजीत कुलकर्णी, डॉ. एस. जी किल्लेदार यांच्या पुढाकाराने समन्वयक डॉ. पोपट कुंभार, डॉ. सोमनाथ भिंगे, डॉ. संदीप बंडगर, डॉ. राहुल आडनाईक, विद्यासेवकांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. डिसोझा यांनी स्वागत केले. डॉ. निलेश चौगुले यांनी आभार मानले. प्रा. ऋतुजा शहा यांनी सूत्रसंचालन केले.

### पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतील विजेते

■ अनुक्रमे तीन क्रमांक असे, मोहम्मद तैफुर जमीर पटवेगार (पाच हजार रुपये रोख आणि प्रशस्तीपत्र), स्पर्शा सुरेश बांदेकर (तीन हजार रुपये रोख प्रशस्तिपत्र), सानिया होसमियां सारंग (दोन हजार रुपये रोख प्रशस्तीपत्र).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2024
लोकमत

# ‘भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी’ अजिंक्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचगाव :** शिवाजी विद्यापीठ अग्रणी फार्मसी महाविद्यालय योजनेअंतर्गत गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ कराड येथे आयोजित 'फार्मा करडंक २०२४' सांस्कृतिक स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूरने विजेतपद मिळविले. स्पर्धेचे संयोजन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर फार्मसी विभागीय कॉलेज यांनी केले होते.

स्पर्धेमध्ये फार्मसी शिक्षणाचे महत्त्व, समाजप्रबोधन व यामधील करिअरच्या संधी यांच्यावर प्रकाशझोत टाकण्याच्या संकल्पनेचा अंतर्भाव असलेल्या बॅले (नृत्यनाटिका), नृत्य (सोलो, सांघिक), नाटक, लघुनाटिका, मूकनाट्य, गायन, वाद्यवादन, फॅशन शो, चित्रकला, रांगोळी, फ्लॉवर अरेंजमेंट, कोलाज, पोस्टर पेंटिंग, लेखन या सांस्कृतिक प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठअंतर्गत १३ फार्मसी महाविद्यालयांच्या चारशेपेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. बॅले (नृत्यनाटिका) स्पर्धेमध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने प्रथम क्रमांक पटकावून विजेतपद मिळविले, तर वैयक्तिक स्पर्धेत रोहित माकले याने उत्कृष्ट अभिनेता, (सांघिक नृत्य) यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

स्पर्धकांना सांस्कृतिक विभागप्रमुख एस. एस. पाटील, दिग्दर्शक यश शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे डॉ. एच. एम. कदम (मानद संचालक, भारती विद्यापीठ, विभागीय कार्यालय, सांगली), प्राचार्य डॉ. एच. एन मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
19 MAR 2024 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रेरणा व ज्ञान सुदृढीकरण कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर(प्रतिनिधी):- प्राणीशास्त्र विषयामध्ये बी.एस्सी.-३ मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात 'इन्स्पिरेशन अँड नॉलेज स्ट्रेन्दनिंग' या विषयावर 'प्रेरणा व ज्ञान सुदृढीकरण कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्ह्यांतील विज्ञान महाविद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थ्यांचा मोठा उत्साही प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख व संयोजक डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. नितीन कांबळे होते, तर डॉ. अण्णा गोफणे यांनी सचिव म्हणून काम पाहिले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्राणीशास्त्र विषयातील संधी, विभागात असलेल्या सुविधा तसेच विद्यापीठातील विविध सुविधा व योजना याबद्दलची माहिती देण्यात आली.

'प्राणीशास्त्र विषयातील नोकरीच्या संधी' या विषयावर विभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, 'विभागातील सुविधा' या विषयावर डॉ. अण्णा गोफणे आणि 'विद्यापीठ परिसरातील विविध विद्यार्थी केंद्रित सुविधा व योजना' याविषयी डॉ. नितीन कांबळे यांनी मार्गदर्शन केले. विभागात सुरू असलेल्या संशोधनाविषयीचे विशेष प्रदर्शन विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. या प्रदर्शनामध्ये प्रामुख्याने रेशीम उद्योग, कीटकांचे जीवनचक्र व त्यांची विविधता, प्राणीसंग्रहालय, शरीरशास्त्रातील विविध उपकरणे, फुलपाखरू उद्यान, प्राणी संगोपन कक्ष, जेल इलेक्ट्रोफोरेसिस, विविध सूक्ष्मदर्शक, स्पेक्ट्रोमीटर, लॅमिनार एअर फ्लो इत्यादी बाबी प्रदर्शित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना विद्यापीठाचा परिसर, जलसंवर्धनाचे प्रयोग, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, एकात्मिक सुविधा केंद्र या ठिकाणीही भेटी घडविण्यात आल्या. याविषयी विद्यार्थी व शिक्षकांनी अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. डॉ. गोफणे यांनी सर्व सहभागींचे आभार मानले.